सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.तंशिप्र-१२२६/प्र.क्र.०७/थेद्विव/केंप्रप्र/२०२६/ दिनांक - २४.०७.२०२६

## शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी आणि थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता महत्वाची सुचना

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी आणि थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र या पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता राबविणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापिठ संचालित व खाजगी विनाअनुदानित पदवी शैक्षणिक संस्थांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन नोंदणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे आणि अर्ज निश्चित करणे या प्रक्रियेसाठी अंतिम तारीख अनुक्रमे २२.०७.२०२६ आणि २३.०७.२०२६ आहे.

ज्या उमदेवारांचे पदवीका अंतिम वर्षाचे निकाल अर्ज निश्चितीच्या अंतिम दिनांकापर्यंत अप्राप्त असतील अशा उमेदवारांनी/ पालकांनी सीईटी कक्षास मुदतवाढीबाबत विनंती केली आहे, अशा उमेदवारांची शैक्षणिक हित लक्षात घेता हरकती सादर करण्याच्या कालावधीमध्ये (Grievance Period) सदर उमेदवारांनी नोंदणी करुन अर्ज निश्चिती करु शकतील परंतू अशा उमेदवारांना हरकती सादर करण्यासाठी अतिरिक्त कालावधी (Grievance Period) दिला जाणार नाही.

सदर प्रवेश प्रक्रियेसाठी उमेदवारांद्वारे संकेतस्थळावर अर्ज नोदंणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे व प्रवेशासाठी कागदपत्रांची पडताळणी आणि अर्ज भरल्याची निश्चिती करण्यासाठी तसेच हरकती सादर करण्यासाठी कालावधीचा (Grievance Period) वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले असून खालीलप्रमाणे हरकती सादर करण्याकरिता कालावधी (Grievance Period) नमुद करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | हरकती सादर करण्यासाठी कालावधी (Grievance Period) |
|---|---|---|
| १. | थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी | २६.०७.२०२६ ते २८.०७.२०२६ |
| २. | थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र | २७.०७.२०२६ ते २९.०७.२०२६ |

(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई